# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६८०४७  Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि-१३/विवि/**०३**/२०२१
दिनांक : ०२.०१.२०२१

प्रति,
मा.प्राचार्य/विभागप्रमुख/प्रभारी अधिकारी
सर्व संलग्नित महाविद्यालये/पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग/
पद्व्युत्तर शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय : विद्यापीठ विनियम क्र.१२/२०१९ अन्वये विद्यार्थी विकास विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरीता आवेदनपत्र पाठविण्याबाबत...**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भाकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०१९-२०२० पासून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे खालीलप्रमाणे विविध योजना विनियम क्र. १२/२०१९ अन्वये राबविण्यात येणार असून योजनेची विनियमावली सोबत जोडली आहे.

| **अ.क्र.** | **राबविण्यात येणाऱ्या विविध योजना** | **विनियमाप्रमाणे अंतिम तारीख** | **सत्र २०२०-२०२१ करीता निश्चित करावयाची अंतिम तारीख** |
|---|---|---|---|
| ०१. | संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना | ३१ ऑगस्ट | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०२. | संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना | ३१ ऑगस्ट | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०३. | संत गाडगे बाबा शुध्द पेयजल योजना | ३१ ऑगस्ट | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०४. | संत गाडगे बाबा विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना | ३१ ऑगस्ट | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०५. | विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती | ३० सप्टेंबर | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०६. | स्व.प्रा.रामप्रकाश शामलालजी राठी स्मृती शिष्यवृत्ती | ३० सप्टेंबर | **१५ जानेवारी, २०२१** |
| ०७. | संत गाडगे बाबा विद्याधन योजना | ३० नोव्हेंबर | **१५ जानेवारी, २०२१** |

आपणास विनंती करण्यात येते की, सोबत जोडलेल्या विनियमानुसार विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयाचे सॉफ्टवेअर हाताळण्यासंबंधी दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार **http://www.sd.sgbau.ac.in तसेच विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरील Homepage मधील Online Services यामधील Student Development या Link वर** दिलेले आवेदन पत्र सत्र २०२०-२०२१ मध्ये आपल्या महाविद्यालयातील पात्र असलेल्या विद्यार्थीनींकडून भरुन घेवून प्राप्त आवेदन पत्राचे **Hard Copy** प्राचार्यांचे/विभागप्रमुखांचे स्वाक्षरीनिशी व आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित करुन संचालक, विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे कार्यालयास **दिनांक १५ जानेवारी, २०२१** पर्यंत किंवा पूर्वी पोहचेल या बेताने पाठवावी.

सोबतचे आवेदनपत्रात विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयामार्फत, प्राचार्यांचे/विभागप्रमुखांचे स्वाक्षरीनिशी, आवश्यक त्या **कागदपत्रांच्या सत्यप्रती स्वाक्षांकित नसल्यास अथवा ऑनलाईनद्वारे भरलेला अर्ज** सादर न केल्यास तसेच विहित मुदतीत आवेदन पत्र प्राप्त न झाल्यास आवेदन पत्र विचारात घेतले जाणार नाही याची कृपया कटाक्षाने नोंद घ्यावी, ही विनंती. सदर माहिती ही विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर **Students Development** या शिर्षातील **Letter** या उपशिर्षामध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे. कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(डॉ. दिनेशकुमार सातंगे)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**सहपत्र** : विनियम क्रमांक १२/२०१९

प्रतिलिपी :
०१. मा.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०२. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
०३. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.